**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**३ रा मजला, शासकीय परिवहन सेवा इमारत, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ३०.**

**दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाअंतर्गत (Deendayal Antyodaya Yojana - National Urban Livelihoods Mission) राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष (State Mission Management Unit) येथे तांत्रिक तज्ञांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेकरीता https://maharecruitment.mahaonline.gov.in यांच्या मार्फत अर्ज मागविणेबाबत**

**राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष (SMMU)**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | इतर क्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य अभियान व्यवस्थापक (निवारा आणि सामाजिक संरचना) | १ | दोन वर्ष पुर्ण वेळ पी.जी.डी.एम / एम.बी.ए किंवा इतर कोणत्याही संबंधित शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सरकार मान्यता प्राप्त संस्थेतून पदवी परिक्षा उत्तीर्ण, त्याचबरोबर गरिबी उच्चाटण कार्यक्रमात समावेश असलेल्या सामाजिक विकास आणि आस्थापना / देखरेख / समुदाय पायाभुत सुविधा राखणे यामध्ये किमान ८ वर्षांचा अनुभव. | उमेदवार हा MS-OFFICE मध्ये पारंगत असावा. तसेच त्याला भागीदारी व्यवस्थापनाचे आकलन तसेच मजबूत विश्लेषणात्मक, संकल्पनात्मक आणि मोक्याचा विचार करण्याचे कौशल्य तसेच मोठया प्रमाणात नियोजन हाताळण्यासाठी क्षमता, MIS हाताळणे इ. असावे. सरकारी संस्थेबरोबर काम करण्याचा अनुभव असलेल्यास प्राधान्य दिले जाईल. |
| २ | राज्य अभियान व्यवस्थापक (कौशल्य आणि उपजिवीका) | १ | दोन वर्ष पुर्ण वेळ पी.जी.डी.एम / एम.बी.ए किंवा इतर कोणत्याही संबंधित शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सरकार मान्यता प्राप्त संस्थेतून पदवी परिक्षा उत्तीर्ण, त्याचबरोबर कौशल्य प्रशिक्षण व रोजगार संधी कार्यक्रमाची अंमलबजावणीत किमान ८ वर्षांचा अनुभव | --- वरीलप्रमाणे ---------- |
| ३ | राज्य अभियान व्यवस्थापक (वित्तीय समावेशन | १ | दोन वर्ष पुर्ण वेळ पी.जी.डी.एम / एम.बी.ए किंवा इतर कोणत्याही संबंधित शाखेतील पदव्युत्तर किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा | --- वरीलप्रमाणे ---------- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आणि लघुव्यवसाय) | | सरकार मान्यता प्राप्त संस्थेतून पदवी परिक्षा उत्तीर्ण, तसेच (credit Linkages) क्रेडिट लिंकेज, सामाजिक सुरक्षा आणि / किंवा (मायक्रो इंटरप्राईजेस प्रमोशन) दारिद्र निर्मुलन कार्यक्रमात/ वित्तीय संस्था यात कि मान ८ वर्षांचा अनुभव | |
| ४ | राज्य अभियान व्यवस्थापक (मानवी संसाधन आणि क्षमता बांधणी) | १ | दोन वर्ष पुर्ण वेळ पी.जी.डी.एम / एम.बी.ए किंवा इतर कोणत्याही शिस्त संबंधित शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा सरकार मान्यता प्राप्त संस्थेतून पदवी परिक्षा उत्तीर्ण, त्याचबरोबर त्यास कर्मचारी भरती, प्रशिक्षण आणि राज्यस्तरीय प्रकल्पमध्ये क्षमता बांधणी (Capacity Building) चा किमान ८ वर्षाचा अनुभव. | उमेदवारास अनुक्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या क्षमतांव्यक्तिरिक्त ग्राहक व्यवस्थापन करण्याची क्ष मता, उत्कृष्ट बोलणी कौशल्य, मोठया प्रमाणात भरती करण्याची क्षमता, एका विशीष्ट मुद्यावर/विषयावर आधारीत क्ष मता बांधणी धोरण आणि विभाग विकास करण्याची क्षमता इ. असावी. |
| ५ | राज्य अभियान व्यवस्थापक (माहिती संनियंत्रण प्रणाली, मुल्यांकन व संनिंत्रण ) | १ | शासन मान्यता प्राप्त संस्थेकडुन किंवा विदयापिठातुन २ वर्ष पुर्ण वेळ व्यवस्थापन (management) मध्ये पदव्युत्तर डिप्लोमा / संगणक विज्ञान (Computer Science) मध्ये मास्टर्स, M.Sc (Computer Science), B.Tech (Computer Science) किंवा MCA व किमान ५ वर्षांचा अनुभव मोठया विकास प्रकल्पामध्ये MIS (Monitoring Information System) आणि ME (Monitoring Evolution) ची अंमलबजावणी करणे, प्रामुख्याने गरिबी उच्चाटण करण्याचा प्रकल्प आणि माहीती आकडेवारीचे विश्लेषण तंत्र यात कमीतकमी ५ वर्षाचा अनूभव | उमेदवारास अनुक्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या व्यतिरिक्त खूप चांगले दस्तऐवज (Documentation) कौशल्य असावे तसेच संबधित व्यक्ति प्रकल्प व्यवस्थापन Software database management आणि web site विकास आणि व्यवस्थापन करण्यास पारंगत असावा. |

अ) **<u>राज्य अभियान व्यवस्थापन कक्षः-</u>**

कार्याचा आवाका :-

सदर उमेदवार हा मुंबईमध्ये राज्य पातळीवर राज्य अभियान संचालकास SULM (State Urban Livelihood Mission), NULM (National Urban Livlihood Mission) अंतर्गत संबंधित उपंगांच्या अंमलबजावणीसाठी मदत करेल. सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असून सुरुवातीला २ वर्ष करार प्रतिबध्दता आहे. करार नुतनीकरण कामाचे मुल्यमापन दर दोन वर्षांनी केले जाईल. पदाधिकारी त्यांचा अहवाल राज्य मिशन संचालक, SULM यांना सादर करेल. तो/ती लक्षपूर्वक काम

करेल आणि NULM संबंधित उपांगांचे शहर पातळीवर जबाबदार असलेल्या अधिका-यांबरोबर सहकार्य करेल. उमेदवाराला राज्यातील NULM शहरामध्ये व्यापक प्रवास करावा लागेल. उमेदवाराचे मराठी आणि इंग्रजी भाषेवर .(लिहिण्यामध्ये आणि बोलण्यामध्ये) प्रभुत्व असावे.

**अर्ज करण्याची शेवटची तारीख - ०७.१०.२०१७**

**अटी व शर्ती:-**

१. तांत्रिक तज्ञ यांची पदे पुर्णपणे कंत्राटी पध्दतीची आहेत. सदर पदे हि अभियान कालावधीकरीताच असून अभियानाबरोबर संपुष्टात येतील. निवड झालेल्या तांत्रिक तज्ञांशी दोन वर्षाचा कंत्राट करण्यात येईल. त्यापैकी नियुक्ती दिलेल्या दिनांकापासून प्रथम सहा महिनेचा कालावधी हा परिवेक्षाधीन कालावधी असेल. परिवेक्षाधीन कालावधीमध्ये जर काम समाधानकारक आढळले नाही तर सक्षम प्राधिकारी याबाबत योग्य ती कार्यवाही करतील. आवश्यक वाटल्यास एक महिन्याची नोटीस देऊन बडतर्फ ही करण्यात येईल.

२.राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाव्दारे तांत्रिक तज्ञाचा केलेल्या कामाचा आढावा त्यांना नेमुण दिलेल्या प्रमुख जबाबदाऱ्या व वार्षिक कृती आराखड्यामधील साध्य केलेले उद्दिष्ट यावर ठरविण्यात येईल. जर तांत्रिक तज्ञ यांनी केलेले काम समाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्यांचा करार नुतनीकरणास ते पात्र ठरतील.

३. तांत्रिक तज्ञ यांना रक्कम रुपये ६०,०००/- दरमहा मानधन देण्यात येईल.

४. अभियानाच्या दौ-यावरिल प्रवास भत्ता, महाभाई भत्ता, जागा आणि अन्न यांचा खर्च राज्य अभियान संचालक निश्चित करतील.

५.इतर अटी व शर्ती या करारान्वये निश्चित केल्या जातील.

**अर्ज करण्याची पध्दत:-**

१. अर्जदाराने https://maharecruitment.mahaonline.gov.in या वेब साईट व्दारे दिनांक **१६.०९.२०१७ ते दिनांक ०७.१०.२०१७** या कालावधीमध्ये अर्ज सादर करावा.

२. अर्जदाराने maharecruitment या पोर्टल वर स्वत:चे Profile निर्माण करणे गरजेचे आहे.

३. Profile निर्माण करणे आणि अर्ज भरणे याकरीता maharecruitment या पोर्टलच्या मुख्य पृष्ठावर महत्वाच्या सूचना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

४. महा-ई-सेवा केंद्र मार्फत ठराविक फि भरणा केल्यास अर्जदार ऑनलाईन अर्ज भरु शकतो.

५. Profile पुर्ण भरुन झाल्यानंतर अर्जदाराने ज्या पदाकरीता अर्ज भरत आहोत ते पद निवड करावे.

६. अर्जदार खालीलप्रमाणे फि भरु श तो, सदर फि हि नापरतावा असेल.

अ.नेट बँकींग

ब. क्रेडिट कार्ड

क. डेबिट कार्ड

ड. स्टेंट बँक ऑफ इंडीया चे चलन

ई. पे-टीएम

७. अर्ज भरण्याकरीता देण्यात आलेली लिंक हि **दि. ०७.१०.२०१७ रोजी रात्री ११.५९** वाजता बंद करण्यात येईल. अर्जदाराने अर्ज संपुर्ण भरुन बंद करण्यापुर्वी योग्य ती फि भरणे आणि फि भरलेल्या चलन यांची छायांकित प्रत घेणे गरजेचे आहे.

८. जे अर्जदार स्टेंट बँक ऑफ इंडीया चे चलन मार्फत फि भरणार असतील त्यांनी अर्ज सादर करावयाच्या अंतिम तारखेच्या अगोदर स्टेंट बँक ऑफ इंडीया च्या कोणत्याही शाखेमध्ये फि भरणे गरजेचे राहील.

९. अर्ज सादर करावयाच्या अंतिम तारखेच्या नंतर फि भरल्यास सदर फि ग्राह्य धरण्यात येणार नाही तसेच सदर फि हि आपणास पुन्हा अदा करण्यात येणार नाही.

१०. अधिक माहितीकरीता अथवा त्रुटींकरीता अर्जदाराने दुरध्वनीव्दारे ०२२-६१३१६४०३ या वर किंवा mr.support@mahaonline.gov.in या ई-मेल वर संपर्क साधावा.

११. परिक्षेचे दिनांक अर्जदारास कळविण्यात येईल. अर्जदाराने वेळोवळी पोर्टलवर प्रसिध्द केलेल्या सूचना बघत जाव्यात. परिक्षेचे प्रवेशपत्र अर्जदार त्यांच्या प्रोफाईलमधून डाउनलोड करु शकतात. परिक्षेचे दिनांक, स्थळ, वेळ व परिक्षेच्या सूचना हे सर्व परिक्षेच्या प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेले असेल. परिक्षेचे प्रवेश पत्र अर्जदारांना परिक्षेच्या १ आठवड्यापुर्वी त्यांच्या Profile मध्ये प्रसिध्द करण्यात येईल.

राज्य अभियान संचालक
राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष
दिनदयाळ अंत्योदय योजना -
राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान